आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

Nov. 2022, Issue-95, Vol-01

Editor

Dr. Bapu g. Gholap

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) NEW NATIONAL EDUCATION POLICY OF INDIA: TRANSFORMING .....
**Dr. Manisha Vinay Aole, Chandrapur** ||10

02) A Review of Pradhan Mantri Ujjwala Yojana in Rural Area of....
**Dr. Anandprakash R. Bhele, Wardha** ||14

03) Importance of leading a healthy life
**Ghanghav Vijay Ramnath** ||20

04) RIGHT TO PRIVACY: A FUNDAMENTAL RIGHT
**Dr. Jaivir Singh** ||22

05) A STUDY OF EDUCATIONAL PROBLEMS DUE TO COVID – 19 FOR STD....
**Patel Kamleshkumar Ranchhodbhai, Gujarat** ||26

06) A COMPARATIVE STUDY OF EDITORIAL PAGES OF HINDUSTAN AND DAINIK.....
**Rahul Kumar, Ayushi Raj, Chandauti, Gaya** ||28

07) A STUDY ON ROLE OF GOVERNMENT IN PROMOTING FINANCIAL INCLUSION
**Dr. Shashi Kant Tripathi, Rakesh Kumar Maurya, Lucknow** ||33

08) Indian Agriculture in Post-independence Period: An overview
**Asst. Prof. Subhash Gangaram Shinde, Thane** ||37

09) VARIOUS LAWS REGARDING WOMEN'S EMPOWERMENT IN INDIA: AN OVERVIEW
**Ms. Shweta Singh, Prof. Anuradha Aggarwal, Allahabad** ||41

10) Role of agriculture sector in economic development
**Dr. Dubale Yeshvant Bhaurao, Partur. Dist: Jalna** ||48

11) Common Errors Committed by Students of Class VII and VIII in English....
**Dr. Manohar Lal, Uchana Kalan (Jind)** ||54

12) राष्ट्रसंताचे स्त्री उन्नतीचे विचार
प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे, सिंदखेडराजा, जि. बुलडाणा ||58

13) ग्रामीण कवितेतील प्रेमभाव
प्रा. संजय विष्णू साठे, टेंभुर्णी ||61

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**12**

# राष्ट्रसंताचे स्त्री उन्नतीचे विचार

**प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे**
समाजशास्त्र विभाग
संत भगवान बाबा कला महाविद्यालय
सिंदखेडराजा, जि. बुलडाणा

************

विद्या गुरुहूनि थोर । आदर्श मातेचे उपकार ।
गर्भापासूनि तिचे संस्कार ।। बालकावरि ।।

**— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली सारख्या लहानशा गावी एका दरिद्री, अज्ञानी व मागासलेल्या कुटुंबात झाला. तुकडोजी महाराजांचे मुळ नाव माणिक बंडोजी इंगळे असे होते. त्यांच्या वडीलांचे नाव बंडोजी तर आईचे नाव मंजुळाबाई होते. आज संपूर्ण देशात त्यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखतात. शासनाने नागपुरच्या विद्यापिठास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठ असे नाव देवून त्यांच्या कार्याचा गौरव केल्याचे दिसून येते. भजन आणि किर्तनाव्दारे त्यांनी आयुष्यभर समाज प्रबोधन केले.

गुरु आकडोजी महाराज यांनी त्यांचे मुळचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे त्यांचे नामकरण केले. राष्ट्रपती भवनात झालेले त्यांचे खंजिरिवरील भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना प्रथमच "राष्ट्रसंत" म्हणून संबोधले होते. "जनसेवा हिच ईश्वर सेवा" मानणारे तुकडोजी महाराज हे समाज सुधारक संत आहेत. सर्वधर्म समभाव, महिलांचे सशक्तीकरण, बलोपासना आणि आध्यात्मिक विकास हे समाज सुदृढ करणारे त्यांचे मापदंड होते.

भारत हा विविधते बरोबरच विविध खेडयांचा मिळून बनलेला देश आहे. त्यामुळे देशाचा विकास करावयाचा असेल तर ग्रामिण भाग सुधारला पाहिजे जुन्या अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, अज्ञान, कर्मकांड या सारख्या समाज विघातक प्रथापासून मुक्त झाला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. ते महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील रस्ते बांधण्यापासून अनेक सामाजिक सुधारणामध्ये सहभागी झालेले दिसून येतात.

परंपरागत समाजव्यवस्थेत महिलांना समाजात अगदी कनिष्ट व हीन दर्जा दिला जात होता. स्त्री अनेक रुढीवादी बंधनाने जखडली गेली होती. अज्ञान, बालविवाह, विधवा विवाहास विरोध, सतीप्रथा, देवदासी, मुरळी अशा अनेक बंधनांनी स्त्री बंदिस्त होती. "चुल आणि मूल" ऐवढेच जिचे कार्यक्षेत्र मर्यादीत होते. समाज तिच्याकडे 'भोगवस्तू' म्हणून बघत होता. तिला शिक्षण घेण्याची व घराबाहेर पडून नोकरी, व्यवसाय करण्याची अनुमती नव्हती. यामुळे संपूर्ण स्त्री समाज हा विकासापासून वंचित होता. स्त्रीयांच्या विकासा शिवाय, त्यांच्या उन्नती शिवाय समाजाचा सर्वांगिन विकास होवू शकत नाही. अशी समाज सुधारक राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची धारणा होती. स्त्री शिवाय पुरुषांचा, समाजाचा व देशाचा विकास होवू शकत नाही. म्हणून त्यांनी समाजात स्त्री उन्नतीचा प्रचार आणि प्रसार केला.

महिलान्नोती हा तुकडोजी महाराजांच्या विचार विश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. महिलान्नोती बाबत राष्ट्रसंताचे विचार खूप व्यापक असलेले दिसून येतात.

1. तुकडोजी महाराज म्हणतात, प्राचिन समाज व्यवस्थेत वैराग्याने जरी स्त्रीयांचा अव्हेर केला, त्यांनी स्त्रीयांना नाकारले, त्यांचा विटाळ मानला असे असले तरी त्यांनी विवक बुध्दीने साधना केल्यानंतर त्यांनीच स्त्रिला वंदन केले, माउली म्हणून स्त्रीचा गौरव केला. समाजातील ज्ञानी, वैरागी, साधु, संत यांनी स्त्रीला माउली मानून वंदन केले समाजातील सर्वांनी स्त्रीयांचा सन्मान केला पाहिजे. अशी शिकवन त्यांनी समाजाला दिली.

**2. समाजाच्या सर्वांगिन विकासासाठी स्त्री उन्नती आवश्यक :**

समाजाने स्त्री कर्तत्वाला, तिच्या बुध्दीमत्तेला ओळखले नाही. समाजाने स्त्रीयांना नाकारले, त्यांना हीन समजले, त्यांच्यावर असंख्य बंधने लादली. त्यामुळे समाज जिवनाची मोठया प्रमाणावर हानी झाल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात.

**3. पुरुषी मानसिकता बदलण्याची गरज :**

तुकडोजी महाराज म्हणतात, समाजाने संपूर्ण

स्त्री समाजाला हीन, दीन, दुर्बल, अबला समजले. पुरुषांची स्त्रीयां विषयी अशी हीन मानसिकता बनल्यामुळे स्त्रियांना पशु समजल्या गेले. याच स्त्रियांच्या पोटी अशा मानसिकतेतून जन्मास आलेली संतती देखिल हीन आणि पशु संस्काराची बनली. त्यामुळेच आज सर्व जगात आपणास पाशवी अन्याय, अत्याचार घडतांना दिसून येतात. त्यामुळे समाजाची ही स्त्रीया विषयीची मानसिकता बदलने आवश्यक आहे.

**4. गुलाम पध्दतीस विरोध :**

अनेक धार्मिक ग्रंथात स्त्रीयांना गुलाम समजल्या गेले. त्यांना त्यांच्या उध्दाराचे व प्रगतीचे कुठलेच हक्क नव्हते. त्यांनी फक्त पुरुषांची दासी म्हणून रहावे. पुरुषांची व कुटुंबाची सेवा करावी. तुकडोजी महाराज म्हणतात असे म्हणने व वागणे शहाण्या माणसाला व समाजाला शोभत नाही ते स्वार्थीपणाचे लक्षण आहे.

**5. परंपरागत विचार सरणी बदलणे आवश्यक :**

समाजाची परंपरागत जुनी व खुळचट विचार सरणी होती की, स्त्री ही प्रत्येक कार्यात धोंड म्हणजे अडचण आहे. स्त्रीयामुळे समाजाची प्रगती होत नाही. म्हणून स्त्रियांच्या प्रगतीत खंड पाडला पाहिजे. अशा विचारसरणी मुळे स्त्रीयांच्या प्रगतीत अनेक अडचणी समाज व्यवस्थेने निर्माण केल्या आहेत. त्या अडचणी स्त्रीउन्नतीसाठी दुर करणे प्रत्येक समाजाचे व व्यक्तीचे आद्य कर्तव्य ठरते.

**6. समाजाचा उध्दार स्त्रीयांच्या हाती :**

म्हणतात ना "जिच्या हाती पाळण्याची दोरी ।
ती जगाची उध्दारी" ।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, "स्त्री पुरुष हे दोन्ही ही संस्कारे जन्मती" त्यांची जन्म घेण्याची एकच पध्दत जगात रुढ आहे. निसर्गत: दोन्ही समान आहेत. स्वप्रयत्नाने, स्वकर्तृत्वाने ते स्वत:ची उन्नती करतात. हे जरी खरे असले तरी समाजाचा, व्यक्तीचा विकास हा स्त्रियांच्याच हाती असतो.

**7. प्राचिन काळात ही थोर स्त्रीया होत्या :**

समाज व्यवस्थेने देवी देवता भिन्न केल्या असल्या तरी अनेक ऋषी मुनींना माता तर होत्याच पण पत्नी सुध्दा होत्या. महिलांमध्ये अनेक साध्वी देखिल झाल्या आहेत. स्त्रीयांनी वेद व ग्रंथ लिहिले, ब्रम्हवाद केले, अनेक विद्या, कला, कौशल्य आणि शोध लावण्यात स्त्रीया अग्रेसर होत्या. याचे दाखले आपणास पुराणात व अनेक धार्मिक ग्रंथात मिळतात.

**8. देशहितासाठी बलिदान :**

राष्ट्रसंत तुकडेजी महाराज म्हणतात, "परकिय आक्रमणाच्या वेळेस अनेक स्त्रियांनी युध्दकलेचे शिक्षण घेवून युध्द केले". भारतीय स्वातंत्र्य लढयात ही अनेक स्त्रीयांनी स्वत:हून भाग घेतलेला आहे. देशासाठी अनेक स्त्रीयांनी बलिदान सुध्दा दिले आहे.

**9. पुरुषांना प्रेरणा व प्रोत्साहन :**

प्राचिन काळापासून स्त्रीया ह्या समाजासाठी व पुरुषासाठी प्रेरणादायी आहेत. पती, पुत्रांना त्या सतत प्रेरणा देत असतात. प्रसंगी पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करतात व लढतात. उदा. राष्ट्रमाता जिजामातेच्या प्रेरणेने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापणा केली. म.फुले यांनी सावित्रीबाईच्या सहकार्याने समाजात मुलींच्या व दलितांच्या शिक्षणाचे व उध्दाराचे कार्य केले.

**10. मुलींना शारीरीक शिक्षण द्यावे :**

तुकडोजी महाराज म्हणतात समाजातील मुलांप्रमाणेच मुलींना देखिल शारीरीक शिक्षण देणे गरजेचे आहे. धावणे, कराटे, बॉक्सींग, थाली फेक, गोळा फेक, भाला फेक या सोबतच स्वसंरक्षणाचे धडे दिले पाहिजे. मुली मुलापेक्षा ही धीट व चपळ आहेत. त्यांना फक्त प्रशिक्षणाची व समाजाच्या पाठिंब्याची गरज आहे. अशा शारीरीक शिक्षणामुळे गावगुंड आणि वाईट प्रवृत्तीच्या व्यक्तींपासून त्या स्वत:चे संरक्षण करतील.

**11. स्त्रीयांना स्वावलंबनाचे धडे द्यावे :**

स्त्रीयांना स्वावलंबी बनवून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करावे. त्यामुळे त्यांच्यातील परावलंबनाची भावना नष्ट होईल. त्यांचे आत्मीक बळ वाढेल. प्राचिन समाज व्यवस्थेचा विचार केल्यास अनेक स्त्रीयांनी असुरांचे मर्दन केल्याचे आपणास दिसते. त्यासाठी महिलांना स्वावलंबी बनविणे समाज हितासाठी व महिलांच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

**12. पुरुषप्रधान संस्कशतीचा स्वार्थीपणा :**

परंपरागत समाज व्यवस्थेत पुरुषप्रधान संस्कशती ने सर्व अधिकार हे पुरुषांना दिले. स्त्रियांना नाममात्र

दुय्यम स्थान देवून त्यांच्यावर अनेक जाचक बंधने लादली. या सर्व बंधनामुळे स्त्रीयांची प्रगती खुंटली. त्यांचे जीवन रुक्ष व उजाड बनले. त्यामुळे हि पुरुषांची स्वार्थी वृत्ती बदलणे स्त्री उन्नतीसाठी आवश्यक आहे.

**13. समान हक्क :**

समाज व्यवस्थेत मुला मुलींना समान हक्क व संधी असल्या पाहिजेत. लिंग भेदावरुन कोणतेही हक्क नाकारले जावू नयेत. स्त्री पुरुष समान आहेत. त्यामुळे पुरुष किंवा मुलेच प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर न ठेवता सर्व क्षेत्रात मुली व महिलांना समान संधी व प्रगतीची व्यवस्था प्रत्येक समाजात असली पाहिजे.

**14. प्रतिष्ठे संबंधी समान नियम :**

समाजात स्त्री पुरुषांची प्रतिष्ठा समान असली पाहिजे. परंपरागत समाज व्यवस्थेत स्त्रीयासाठी पूर्नविवाह बंदी, सतीप्रथा, शिक्षण बंदी, बालविवाह, मुरळी प्रथा, देवदासी, धार्मिक कनिष्ठता अशा अनेक प्रथा फक्त स्त्रीयांसाठी होत्या. परंतु पुरुषांना या कोणत्याच बाबी लागु नव्हत्या.

**15. अन्यायकारक रुढी व प्रथांना बंदी :**

स्त्रीयांवर रुढी आणि प्रथांनी लादलेली सामाजिक व धार्मिक बंधने कायद्याने बंद करावीत. उदा. विधवांना ध ार्मिक कार्यक्रमात सहभाग न देणे किंवा अपशकून मानने, विधवांचे केशवपन करणे, विधवा स्त्री ला सती जाण्यास भाग पाडणे या सारख्या अनेक अनिष्ट रुढी वर बंदी घातल्यास महिला उन्नती साध्य होण्यास वेळ लागणार नाही. असे राष्ट्रसंतांना वाटत होते.

याशिवाय ही अनेक उपाय राष्ट्रसंतांनी स्त्री उन्नतीच्या संदर्भात सांगितले आहेत.

16. मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणे.
17. स्त्री पुरुषांना समान नियम व कायदा करणे.
18. महिलांचा सर्वांगीण विकास साधणारे शिक्षण देणे.
19. पारमार्थिक बाबतीत महिलांना संधी देणे.
20. शिल व चारित्र्याची शिकवण मुला मुलींना देणे.
21. बालपणापासून मुलींवर त्यांचा आत्म विश्वास वाढवणारे योग्य संस्कार करणे.
22. समाजातील पडदा पध्दत व बुरखा पध्दत बंद करणे.

अशा प्रकारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्त्री उन्नतीसाठी अनेक बाबीत सुधारणा सांगितल्या आहेत. तर काही बाबी समाजात नव्याने निर्माण करण्याची गरज त्यांनी वेळोवेळी बोलून दाखविली आहे. समाजात त्या गोष्टींचा प्रचार आणि प्रसार केला आहे. तर अनिष्ट व घातक रुढी, प्रथा परंपरावर टिका करुन समाजातून व लोकमनातून त्यांचे निर्मुलन करण्याचा प्रयत्न देखिल त्यांनी केलेला दिसून येतो. स्त्री उन्नतीच्या संदर्भात आणि एकूनच समाज व राष्ट्रउन्नतीच्या बाबतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केलेले कार्य आणि प्रबोधन निश्चितच समाजाला प्रेरणादायी आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. ग्रामगीता — राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महारांचे जनजागरण — डॉ. भास्कर गिरधारी.
३. राष्ट्रसंत तुकडोजी : जीवन कार्य — डॉ.सुभाष सावरकर.
४. गोष्टीरुप राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — वासंती वैद्य.


❑❑❑